Shri Sairaj Shikshan Pratishthan's
Reg. No. ID No. PU/NS/CS/139/2009
Vishwalata Arts, Commerce & Science College
(College Code : 892)
BHATGAON, Tal. Yeola - 423 401 Dist. Nashik ■ Hello : (02559) 225102, Fax : 225103

Ref. No.

Date :

# Criteria-06

# Governance, Leadership and Management


6.2.2. Organizational structure of the institution including governing body, administrative setup, and functions of various bodies, service rules, procedures, recruitment, promotional policies as well as grievance redressal mechanism.

| Sr.No. | Document |
|---|---|
| 1 | Administrative Setup and By-Law |

Vishwalata Arts, Commerce & Science College Bhatgaon Tal. Yeola (Nashik)

Principal
Vishwalata Arts Commerce & Science College Bhatgaon Tal.Yeola Dist-Nashik

# Administrative Setup




Principal
Vishwalata Arts Commerce
& Science College Bhatgaon
Tal.Yeola Dist-Nashik

# By-laws

अर्ज क्र. 129/2019

अर्जदाराचे नाव :- प्रशांत भंडारे

नक्कल अर्ज प्राप्त दि. :- 7/1/19

नक्कल तयार दि. :-

नक्कल दिली ता. दि. :- 7/1/19

बदल अहवाल / चेंज रिपोर्ट अनुसुची - ३(नियम १३ (१) पहा)

विश्वस्त व्यवस्थेचे नांव:- शाहीराजे शिक्षण प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नोंदणी क्र.:- ओफ - २६६६४ (पुणे) दि. २४/१०/१०

महा: - 2239/08 दि 3/12/08


विश्वस्त व्यवस्थेचा पत्ता: - सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२

| बदलाचे स्वरुप | | बदलाची कारणे | शेरा |
|---|---|---|---|
| परिशिष्ट -१ मधुन खालील नमुद विश्वस्तांची नांवे सन १०/१२/२०११ ते २९/६/२०१६ हा कालावधी पुर्ण झाल्याने कमी करण्यात यावे | | नियम व नियमावली मध्ये बदल झाल्यामुळे परिशिष्ट १ वर नाव नमुद करण्यात यावे. | दि. ५/४/१६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अजेंडा<br>दि. १५/४/१६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा इतिवृत्तांत<br>दि. १४/६/१६ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा<br>दि. ३०/६/१६ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत<br>दि. १०/७/१६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अजेंडा<br>दि. २०/७/१६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा इतिवृत्तांत<br>नाहरकतपत्र<br>संमतीपत्र<br>सोबत जोडला आहे. |
| १ श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | अध्यक्ष | | |
| २ श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | सेक्रेटरी | | |
| ३ श्री. विश्वनाथ नारायण भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | खजिनदार | | |
| ४ श्री. किशोर बन्सीलाल लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |
| ५ श्रीमती कला बन्सीलाल लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |
| ६ श्रीमती सेजल सुरेश धुमाळ<br>मु. पो. राहुरी, ता. अहमदनगर | सदस्य | | |
| ७ श्री. भुषण किशोर लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |
| परिशिष्ट -१ खालील नमुद विश्वस्तांची नांवे सन ३०/६/२०१६ ते २९/६/२०२१ या कालावधी करीता नोंद करण्यात यावे | | | |
| १ श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | अध्यक्ष | | |
| २ श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | सेक्रेटरी | | |
| ३ श्री. विश्वनाथ नारायण भंडारे<br>सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ | खजिनदार | | |

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पुणे विभाग पुणे

Asst. Charity Commissioner Pune

Scanned by CamScanner


10 रु.
कोर्ट फी
Rs.10
COURT FEE
भारत
INDIA
दस रुपये
TEN RUPEES
SANGIETAA LOKANDE
स्टॅम्प व्हेंडर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री. किशोर बन्सीलाल लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |
| ५ | श्रीमती लता बन्सीलाल लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |
| ६ | श्रीमती सेजल सुरेश धुमाळ<br>मु. पो. राजुर, ता. अहमदनगर | सदस्य | | |
| ७ | श्री. भुषण किशोर लाघवे<br>श्रीराम कॉलनी मु. पो. येवला, जि. नाशिक | सदस्य | | |

Asst. Charity Commissioner

दि. २३/१० /२०१८
स्थळ :- पुणे

**श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे**
प्रतिवृत्त देणार नांव व सही

प्रतिज्ञालेख

यात मी **श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे** वय :- सज्ञान धंदा :- समाजकार्य रा. **सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे** ५२ प्रतिज्ञा करतो आणि सांगतो की, वरील फेरफार पत्रकात दिलेली ही माहीती माझ्या पुर्ण माहीती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.
आज दि. २३/१०/२०१८ रोजी पुणे येथे प्रतिज्ञा केली.

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे
प्रतिज्ञा करणार

माझे समक्ष

**Verification**

Solemnly affirmed before me
that the facts mentioned in
application are true to the
best of his information and belief
by Sou/Shri. Prashant V. Bhandare
who is identified before me
by Adv./ID Kunthekar SS
Whom I personally Known

Sk. Muzammil Haider
Notary
GOVT. OF INDIA

GOVERNMENT OF INDIA NOTARY Sk. Muzammil Haider Kondhwa, Pune City Reg. No. 11 Expiry Date 20/4/2020

2 3 OCT 2018

22 OCT 2018

# मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, पुणे विभाग, पुणे यांचे समोर.

न्यासाचे नाव - साईराज शिक्षण प्रतिष्ठान,
सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी,
इंगळे नगर, वारजे जकातनाका,
पुणे - ५२.

नोंदणी क्र. :- एफ - २६६६४/पुणे.
बदल अर्ज क्र. :- ३४२९/२०१८.
कलम :- २२

## निशाणी क्र.१ वरील आदेश

(दि. २८/१२/२०१८)

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मु.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये विश्वस्त बदलाची नोंद परी-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२) अर्ज विहित नमुन्यात दाखल केलेला असुन मु.सा.वि.व्य.नियम १९५१ चे नियम ६ (४) प्रमाणे सक्षम अधिका-यासमोर पडताळलेला आहे. बदल अर्जाच्या पृष्ठर्थ दाखल केलेली कागदपत्रे व बदल अर्जातील मजकूर खोटा असल्याबाबत कसलाही विरोधी पुरावा आला नाही. त्यावरुन बदल अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे दिसून येत आहे. सबब अर्ज वादरहित एकतर्फा आहे.

३) अर्ज नि.क्र. १ चे अवलोकन केले असता, न्यासाची दि. ३०/०६/२०१६ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन त्यातील ठरावानुसार अर्जात नमुद जुन्या विश्वस्तांच्या नावाची व पदांची नोंद कमी करुन घटनेतील तरतुदीनुसार नविन विश्वस्तांची व पदांची निवड दि. ३०/०६/२०१६ ते दि. २९/०६/२०२१ या कालावधीकरीता करण्यात आली त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परी-१ वर घेणेकरीता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

४) अर्जदाराने अर्जासोबत बदल अर्जासोबत सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभा उपस्थिती, सभेचा ठराव, नवनिर्वाचितांचे संमतीपत्र, जुन्या विश्वस्तांचे नाहरकतपत्र, मागील मंजूर बदल अर्ज क्र. १४०४/२०१३ ची प्रत, ज्ञापन, नियम-नियमावली, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५) अर्जदाराचा अर्ज, अभिलेख्यावरील कागदपत्रे, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र विचारात घेता आजपावेतो प्रस्तुत बदल अर्जास हरकत असल्याबाबतचे कोणतेही लेखी कागदपत्र दाखल नाहीत. तरी न्यासाच्या हितासाठी व कारभार सुरळीत चालण्यासाठी स्वेच्छाधिकारान्वये कळविलेला बदल मंजुर करणे उचित वाटते सबब मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

## - आदेश -

१. बदल अर्ज मंजूर करणेत येतो.

२. सदर आदेशाची परिशिष्ट-१ वर योग्य ती नोंद घेण्यात यावी.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

४. वरीलप्रमाणे आदेश अर्जदारास कळविण्यात यावे.

ठिकाण :- पुणे.
दि :- २८/१२/२०१८.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१
पुणे विभाग, पुणे

HM Accept

22/10/18

(प.र.न) ९९२५/18

बदल अहवाल / चेंज रिपोर्ट अनुसुची - ३(नियम १३ (१) पहा)

विश्वस्त व्यवस्थेचे नांव:- साईराज शिक्षण प्रतिष्ठान

विश्वस्त व्यवस्थेचे नोंदणी क्र.: - ओफ - २६६६४ (पुणे) दि.१४/१०/१०

महा: - २२३१०६ दि. १८/१२/०६

विश्वस्त व्यवस्थेचा पत्ता: - सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२

CR No. 3428/18

| बदलाचे स्वरुप | बदलाची कारणे | शेरा |
|---|---|---|
| परिशिष्ट -१ मधुन खालील नमुद नियम हे नियम व नियमावली मधून कमी करण्यात यावे<br>४) सभासदत्व व त्यांची नोंदणेची पध्दत: - संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय व धोरणे मान्य असणारी व साभाजिक कार्याची आवड असलेल्या गुरलीमसमाजातील कोणत्याही सज्ञान व्यक्तिस संस्थेचे सभासद होता येईल. परंतू सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिने संस्थेकडे असणारा नमुना अर्ज दोन सभासदांच्या शिफारशीसह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहीजे. कार्यकारी मंडळाने त्यास मंजूरी दिल्यानंतर अर्जदार व्यक्तिस सभासदात्वाचे अधिकार प्राप्त होईल. सभासद करुन घेणे अथवा नाकारणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.<br>१०) संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना: - संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या सभासदांमधुन कमीतकमी ७ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे कार्यकारी मंडळ पाच वर्षांकरिता निवडुन दिले जाईल. व असे कार्यकारी मंडळा आपल्यामधुन पदाधिकाऱ्यांची निवड करतील संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील वत्यांची मुदत संस्था नोंदणीपासुन पाच वर्षापर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्विकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. कार्यकारी मंडळ आपल्यामधुन अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील व इतर कार्यकारी सभासद राहतील.<br>२५) नांव व उद्देशांत बदल: - संस्थेचे नांव अथवा बदल करावयाचा असेल तर सन १८६० च्या संस्था कायद्यातील कलम १२ व १२अ यातील असणाऱ्या तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात येईल. व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात कार्यकारी मंडळाने विभागिय धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर केला पाहीजे. | नियम व निमयमावली मध्ये बदल झाल्यामुळे परिशिष्ट १ वर नांव नमुद करण्यात यावे. | दि. ६/४/१८ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अजेंडा<br>दि. १५/४/१८ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा इतिवृत्तांत<br>दि. १४/६/१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा<br>दि. ३०/०६/२०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत सोबत जोडला आहे. |

Asst. Charity Commissioner Pune

Asst. Charity Commissioner Pune

10 रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

10 रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

10 रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

SANGIETAA LOKANDE

परवाना क्र.

कम्पाउंड,

पुणे - १

SANGIETAA LOKANDE

Asst. Charity Commissioner

| | | |
|---|---|---|
| **<u>परिशिष्ट -१ मधुन खालील नमुद नियम हे नियम व नियमावली मध्ये नियम नमुद करण्यात यावे</u>** | | |
| ४) सभासदत्व व त्यांची नोंदणेची पध्दत: - संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय व धोरणे मान्य असणारी व सामाजिक कार्याची आवड असलेल्या भारतीय समाजातील कोणत्याही सज्ञान व्यक्तिस संस्थेचे सभासद होता येईल. परंतू सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिने संस्थेकडे असणारा नमुना अर्ज दोन सभासदांच्या शिफारशीसह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहीजे. कार्यकारी मंडळाने त्यास मंजूरी दिल्यानंतर अर्जदार व्यक्तिस सभासदात्वाचे अधिकार प्राप्त होईल. सभासद करुन घेणे अथवा नाकारणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. | | |
| १०) संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना: - संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या सभासदांमधुन कमीतकमी ७ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे कार्यकारी मंडळ पाच वर्षांकरिता निवडुन दिले जाईल. व असे कार्यकारी मंडळा आपल्यामधुन पदाधिकाऱ्यांची निवड करतील संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील वत्यांची मुदत संस्था नोंदणीपासुन पाच वर्षापर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्विकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. कार्यकारी मंडळ आपल्यामधुन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील व इतर कार्यकारी सभासद राहतील. | | |
| २५) नांव व उद्देशांत बदल: - संस्थेचे नांव अथवा उद्देश बदल करावयाचा असेल तर सन १८६० च्या संस्था कायद्यातील कलम १२ व १२अ यातील असणाऱ्या तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात येईल. व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात कार्यकारी मंडळाने विभागिय धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर केला पाहीजे. | | |
| अ) आयकर विभागाच्या पुर्वपरवानगीशिवाय संस्थेच्या नांवात व उद्देशांत व तरतुदींमध्ये बदल करता येणार नाही. | | |
| ब) संस्थेचे मान्यताप्राप्त चार्टर्ड अकाऊंटंट यांच्या कडुनच हिशेब तपासुन व बनवून घेतले जातील. | | |
| क) संस्था विसर्जित करावयाची असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने मंजुरी घेतली जाईल व संस्थेच्या सर्व प्रकरणाचे देवाण-घेवाण संबंधीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. संस्थेची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या संस्थेला जी संस्था आयकर कायद्यांतर्गत तसेच कलम १२ अ प्रमाणे नोंदणीकृत असेल | | |

| | | |
|---|---|---|
| अशा संस्थेस दान म्हणून देता येईल.<br>ड) संस्थेची मिळकत फंड व गुंतवणूक आयकर कायद्याच्या कलम ११ (५) प्रमाणे करण्यात येईल. | | |

Asst. Charity Commissioner

दि.२३/१०/२०१८

स्थळ :- पुणे

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे

प्रतिवृत्त देणार नांव व सही

**प्रतिज्ञालेख**

यात मी **श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे** वय :- सज्ञान धंदा :- समाजकार्य रा. **सोनसाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे** ५२ प्रतिज्ञा करतो आणि सांगतो की, वरील फेरफार पत्रकात दिलेली ही माहीती माझ्या पुर्ण माहीती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

आज दि.२३/१०/२०१८ रोजी पुणे येथे प्रतिज्ञा केली.

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे

प्रतिज्ञा करणार

**माझे समक्ष**

NOTARY ☆ GOVERNMENT OF INDIA
Sk. Muzammil Haider
Area: Pune City
Regn. No. 11293
Expiry Date 20/4/2020

Verification

Solemnly affirmed before me that the facts mentioned in application are true to the best of his information and belief by Sou/Shri. Prashant V. Bhandare who is identified before me by Adv /ID Kumthekar SS Whom I personally Known

Sk. Muzammil Haider
Notary
GOVT. OF INDIA

23 OCT 2018

-: परिशिष्ट - क :-

संस्थेची नियम व नियमावली

## संस्थेचे नाव - साईराज शिक्षण संस्था

संस्थेचा पत्ता - सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी,
इंगळेनगर, वारजे जकात नाका, पुणे ५२

१. **संदर्भीय शब्दाची व्याख्या: -**

अ **संस्था : -** संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व म. सा. वि. व्य. अधिनियम सन १९५० अन्वेय नोंदविण्यात येणारी संस्था.

ब **नियम व नियमावली: -** संस्था नोंदणी अधिनियम म्हणजेच सन १८६० चा भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे संस्था स्थापन करण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम.

क **कार्यकारी मंडळ: -** संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी नंतर वेळोवेळी संस्थेच्या घटनेनुसार सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे असे मंडळ. अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व अन्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड **सभासद: -** संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली नियमितपणे वर्गणी भरणारी व्यक्ति संस्थेची सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

ई. **अनुसूची: -** या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अंशा अनुसूची १, २, ६ की ज्या सन १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमाप्रमाणे आहेत.

फ. **उद्देश: -** संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये कलम २० प्रमाणे उद्देश की जे ज्ञापन पत्रकात नमुद केल्याप्रमाणे आहेत असे उद्देश की ज्या करता संस्था स्थापन करण्यात येत आहे.

२. **संस्थेचे कार्यक्षेत्र:** - संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा / महाराष्ट्र राज्य असे राहील.

३. **हिशोबाचे वर्ष:** - संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल.

४. **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत: -** संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय व धोरणे मान्य असणारी व सामाजिक कार्याची आवड असलेल्या भारतीय समाजातील कोणत्याही सज्ञान व्यक्तिस संस्थेचे सभासद होता येईल. परंतू सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिने संस्थेकडे असणारा नमुना अर्ज दोन सभासदांच्या शिफारशीसंह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहीजे. कार्यकारी मंडळाने त्यास मंजूरी दिल्यानंतर अर्जदार व्यक्तिस सभासदात्वाचे अधिकार प्राप्त होईल. सभासद करुन घेणे अथवा नाकारणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

५. **सभासदांचे प्रकार: -**

अ) संस्थापक सभासद — ब) वर्गणीदार सभासद

क) आजिव सभासद — ड) देणगीदार किंवा हितचिंतक किंवा आश्रयदाते सभासद

इ) सन्माननिय सभासद

अ. **संस्थापक सभासद: -**संस्था स्थापनेच्यावेळी ध्येय धोरणाने प्रेरित होऊन संस्थेच्या ज्ञापनावर सही करणाऱ्या सभासदांना संस्थापक सभासद संबोधण्यात येईल. त्यांचेकडुन प्रवेश फी १०/- व वार्षिक वर्गणी रु. १००/- घेण्यात येईल.

ब. **वर्गणीदार सभासद: -** जे सभासद प्रवेश फी १०/- व वार्षिक वर्गणी रुपये १००/- एकदम पुर्ण भरतील त्यांना वर्गणीदार सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

**आजीव सभासद:** - जी व्यक्ति एकरकमी रु. ५०००/- किंवा वेळोवेळी कार्यकारी मंडळाने निश्चित केलेली रक्कम संस्थेला देईल त्यांना आजीव सभासद संबोधण्यात येईल.

ड. **देणगीदार किंवा हितचिंतक किंवा आश्रयदाते सभासद:** - संस्थेला देणगीरुपाने, वस्तूरुपाने देणगी देणाऱ्या व्यक्तिला देणगीदार किंवा हितचिंतक किंवा आश्रयदाते सभासद म्हणून संबोधण्यात येईल परंतु अशा व्यक्तिस मतदानाचा अधिकार राहणार नाही. तसेच निवडणूकीस पात्र राहणार नाहीत.

ई. **सन्माननीय सभासद:** - समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्तिंना संस्थेचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात येईल अशा सभासदांना देखील निवडणूक लढविता येणार नाही व मतदान करता येणार नाही.

६. **सभासदत्व रद्द होणे:** - अ. सभासदाचा मृत्यू झाल्यास, नादार ठरल्यास, शारिरीक अथवा मानसिक दौर्बल्य आल्यास, ब. संस्थेच्या एखाद्या सभासदांने राजीनामा दिल्यास व तो कार्यकारी मंडळाने स्विकारल्यास सभासदत्व रद्द होईल, क. एखाद्या सभासदास फौजदारी गुन्ह्यासाठी शिक्षा झाल्यास, ड. संस्थेच्या हितास बाधक असे कृत्य केल्यास त्या सभासदास कृत्याबद्दल खुलासा करण्याची संधी देवून त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव कार्यकारी मंडळाने मांडून नंतरच सभासदत्व रद्द करण्यात येईल, ई. संस्थेची वर्गणी सलग तीन वर्षे न भरल्यास, फ. संस्थेच्या सभास सतत गैरहजर राहिल्यास इ. कारणांनी सभासदत्व रद्द होईल.

७. **सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य:** - संस्थेच्या नियमाप्रमाणे सभासदत्व प्राप्त झालेल्या व मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व सभासदांची मिळून सर्वसाधारण सभा होईल. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून तीन महिन्यात कार्यकारी मंडळाने अशी सर्वसाधारण सभा बोलाविली पाहीजे. कार्यकारी मंडळाने ती बोलाविली नाही तर ३/५ सभासद एकत्र येऊन अशी सभा घेणेबाबत योग्यते निर्णय घेऊ शकतील. आणि त्यानुसार होणाऱ्या सभेत संमत झालेले ठराव कार्यकारी मंडळावर बंधनकारक राहतील.

अधिकार व कार्ये

वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च ताळेबंद अहवाल मांडला जाईल. पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करणे व या सर्वांच्या प्रति वार्षिक सर्व साधारण सभेत सर्वसभासदांना दिल्या जातील. कार्यकारी मंडळाची निवड करणे व निवडणुकीचे निकाल जाहीर करणे, पुढील वित्तीय वर्षासाठी चार्टड अकौंटंट अथवा ॲथॉराईज्ड ऑडिटर नेमणे नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असल्यास त्याला मान्यता देणे, उद्देशपुर्तीसाठी संस्थेच्या ध्येय धोरणानुसार चर्चा करणे व निर्णय घेणे. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी सभेपुढे आणलेली कामे करणे, त्याचप्रमाणे अशा सभेत वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येईल. संस्थेच्या सर्व बाबतीत या सभेचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

८. **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या:** - संस्थेचे सेक्रेटरी कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने परिपत्रक/नोटीस काढुन सर्वसाधारण सभा बोलावतील. अशा परिपत्रकांमध्ये सभेचे विषय, सभेची वेळ, तारीख नमुद केलेली असेल अशी नोटीस प्रत्येक सभासदाना सभेपुर्वी किमान ७ दिवस आगोदर मिळेल अशी व्यवस्था असेल. नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असेल तर नोटीस कमीत कमी १५ दिवस आधी दिली पाहीजे. वार्षिक सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्रातून दिल्यास उत्तम. पण ही गोष्ट बंधनकारक राहणार नाही. सभेची नोटीस प्रत्येक सभासदाला पोस्टाने अथवा परिपत्रकाद्वारे सही घेऊन देण्यात येईल. तथापी बाहेरगांवच्या सभासदाला नोटीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोष्टींगने पाठवूनही न

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे<br>अध्यक्ष | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे<br>सचिव | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे<br>खजिनदार |

मिळाल्यास सदर सभेत मंजूर झालेल्या कामकाजात त्याची बाधा येणार नाही. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तिंना निमंत्रित व निरिक्षक म्हणून कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजुरी घेऊन बोलाविता येईल. पण त्यांना सभेच्या मतदानात भाग घेता येणार नाही. सभेला कोरम पटावरील एकुण सभासदा संख्येच्या ३/५ एवढी आवश्यक गणसंख्या राहील. परंतू कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्यातासाने बोलाविली जाईल. व अशा सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही. व तीचे सर्व कामकाज कायदेशिर राहील. पण वार्षिक सभेच्या नोटीशीत तशी सुचना आवश्यक राहील.

९. **विशेष सर्वसाधारण सभा: -** कार्यकारी मंडळात सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल. त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. तसेच पटावरील २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलावली पाहीजे.

१०. **संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना: -** संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या सभासदांमधुन कमीतकमी ७ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे कार्यकारी मंडळ पाच वर्षांकरिता निवडुन दिले जाईल. व असे कार्यकारी मंडळ आपल्यामधुन पदाधिकाऱ्यांची निवड करतील संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील व त्यांची मुदत संस्था नोंदणीपासुन पाच वर्षांपर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्विकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. कार्यकारी मंडळ आपल्यामधुन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील व इतर कार्यकारी सभासद राहतील.

११. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत: -** कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षांचा राहील. दर पाच वर्षांनी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नविन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने केली जाईल. निवडणुकीची कार्यवाही जुन्या कार्यकारी मंडळाकडुन केली जाईल.

१२. **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे: -**

१ **अध्यक्ष: -** संस्थेचे प्रमुख या नात्याने कार्यकारी मंडळाच्या सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा विशेष सर्वसाधारण सभा बोलाविणे. अशा सभांचे अध्यक्षपद स्विकारुन निपःक्षपणे सभा पार पाडणे, समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे, कार्यकारी मंडळावर व संस्थेच्या एकुण कामकाजावर नियमित देखरेख करणे व नियंत्रण ठेवणे. संस्थेच्या महत्वाच्या कागदपत्रांवर सह्या करणे. संस्थेचे बँक खाते चालविणे. तसेच संस्थेच्या कामकाजाबाबत कार्यकारी मंडळाने घेतलेले निर्णय अंमलात आणणे.

२ **उपाध्यक्ष: -** अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे, त्यांच्या गैरहजेरीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद भुषविणे व त्या व्यवस्थित पार पाडणे व इतर वेळी अध्यक्षांना व इतर पदाधिकाऱ्यांना त्यांच्या दैनदिन कामकाजात मदत करणे.

३ **सेक्रेटरी: -** संस्थेच्या ध्येय व धोरणानुसार अध्यक्षांच्या व कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार संस्थेचे दैनदिन कामकाज पाहणे, संस्थेचे दप्तर व पत्र व्यवहार सांभाळणे, अध्यक्षांच्या परवानगीने वेळच्यावेळी कार्यकारी मंडळाच्या सभा व वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविणे व य सर्व सभांची तयारी करणे, नियोजन करणे, सुत्रसंचालन करणे. कार्यकारी मंडळ व संस्थेचा नोकरवर्ग व संस्थेचे इतर सभासद यांच्यातील दुवा म्हणून संबंध ठेवणे, संस्थेचा कायदेशीर

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

प्रतिनिधी म्हणून कामकाज पाहणे, संस्थेच्या सर्व सभांचे इतिवृत्त लिहिणे, कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना व संस्थेच्या इतर सभासदांना आवश्यक ती माहिती पुरवणे.

४ **खजिनदार: -** संस्थेच्या दैनदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र अद्ययावत ठेवणे, सभासद वर्गणी, देणग्या, अनुदाने, व्याज इ. निधींचा व्यवहार चोख ठेवणे, संस्थेचे बँक खाते चालविणे, आर्थिक व्यवहार संभाळणे, मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे. संस्थेचा दैनदिन खर्च भागविणे, संस्थेच्या ऑडिटर कडुन वार्षिक ताळेबंद व जमाखर्च अहवाल तयार करुन घेणे.

५ **सदस्य: -** संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या इतर सदस्यांनी संस्थेच्या सभांना वेळोवेळी हजर राहणे. संस्थेच्या कामकाजात सुचना, हरकती, मते मांडुन चर्चा करणे तसेच इतर पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कामकाजात मदत करणे व संस्थेच्या उद्देशपुर्तीकरिता सतत प्रयत्नशिल राहणे आवश्यक राहील.

१३. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा: -** कार्यकारी मंडळाची सभा किमान वर्षातून चार वेळा बोलावण्यात येईल व आवश्यक वाटल्यास जादा सभा बोलावयाचा अधिकार अध्यक्षांना राहील. अशा सभेत संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल. संस्थेच्या योजनांची रुपरेषा ठरवली जाईल व आवश्यक ते निर्णय घेतले जातील कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाचे सभासद विशेष सभा बोलावू शकतील अशा सभेत र्काकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

१४. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गण संख्या: -** कार्यकारी मंडळाच्या सभासदांना अध्यक्षाच्या किंवा सेक्रेटरीच्या सहीने सभेपुर्वी किमन ७ दिवस आगोदर नोटीस पाठविणे आवश्यक आहे. परंतू तातडीचा प्रसंगी फक्त एक दिवसाची नोटीस समक्ष सही घेऊन तातडीच्या सभा बोलाविण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील. अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठवलेली नोटीस एखाद्या सभासदांस वेळेवर मिळाली नाही तर त्यामुळे बोलाविलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी वेळेच्या आभावी एखाद्या तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास कार्यकारीणीच्या सभासदांकडे लेखीमत मागावून घेण्यात येईल व मताधिक्क्या वरुन तो ठराव अगर निर्णय संमत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेस ३/५ कोरम असावी पण कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्यातासाने बोलाविली जाईल. अशा सभेस कोरमची अवश्यकता भासणार नाही.

१५. **कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम: -** दर पाच वर्षांनी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नविन कार्यकारीणीची निवड केली जाईल. ज्या वर्षि निवडणूक असेल त्या वर्षिच्या सर्वसाधारण सभेच्या नोटीशीमध्ये निवडणुकीचा उल्लेख असेल. विद्यमान कार्यकारी मंडळाकडुन निवडणुकीची पुर्तता केली जाईल. उदा: - मतदान यादी तयार करणे. उमेदवारी अर्ज मागविणे त्याची छाननी करणे इ. ज्या सभासदांनी आपली देय असेलली सर्व वर्गणी भरली असेल अशा सभासदांना निवडणुकीत मतदान करण्यास व उमेदवारी अर्ज भरल्यास भाग घेता येईल. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हेच निवडणुंक अधिकारी म्हणुन काम पाहतील. व निकाल जाहीर करतील नविन कार्यकारी मंडळावर येणाऱ्या अध्यक्षांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने निवडणुक झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत मा. सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर कावयाचा आहे.

१६. **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणेबाबत: -** कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. परंतू मध्यंतरीच एखादे पद काही कारणाने रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळातील इतर

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे<br>अध्यक्ष | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे<br>सचिव | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे<br>खजिनदार |

सदस्य असे रिक्त पद उर्वरित कालावधीकरिता बहूमताने करतील. मा. सहाय धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात तीन महिनेचे आत बदल अर्ज सादर करावयाचा आहे.

१७. **सभासदांचे हक्क व कर्तव्ये: -**

अ **सभासदांचे हक्क: -** सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून चर्चा करण्याचा व आपली मते मांडण्याचा हक्क राहील. त्यांना संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभागी होता येईल, तसेच लेखी सूचना व दाद मागण्याचा अधिकार राहील. मतदानाचा हक्क असलेल्या सभासदांना निवडणुक प्रक्रियेत भाग घेण्याचा हक्क राहील. वार्षिक अहवाल मिळविण्याचा अधिकार राहील. संस्थेचा जमाखर्च व इतर आवश्यक माहिती विचारण्याचा हक्क राहील.

ब. **सभासदांची कर्तव्ये: -** सर्वसाधारण सभेला उपस्थित रहाणे, संस्थेच्या कामकाजात देखरेख करणे, संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे व पदाधिकाऱ्यांना सहाकार्य करणे, सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते किंवा नाही ते पाहणे. संस्थेच्या विविध कार्यक्रमामध्ये सक्रीय सहकार्य करणे.

१८. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये: -** संस्थेची सर्व विद्यमान स्थावर व जंगम मिळकत व पुढे वेळोवेळी वा अन्य मार्गाने मिळालेली मिळकत संस्थेच्य वतीने कार्यकारी मंडळाच्या ताब्यात राहील. स्थावर मिळकतीपासुन मिळणारे भाडे, व्याज वा अन्य उत्पन्न वसुल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्याकरिता वा संस्थेचे कार्य चालविण्याकरिता मंजुर केलेल्या रकमेचा विनीयोग करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून नियम व पोटनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. तसेच संस्थेचे दैनदिन कामकाज पाहणे, नविन समित्या, उपसमित्या नेमणे, त्या बरखास्त करणे, संस्थेच्या ऑडीटरकडुन जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करुन अहवाल तयार करणे. वार्षिक सभेत सादर करणे, संस्थेचे हिशेब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवून त्यांची परिक्षण चार्टड अकौंटंट अथवा ॲथॉराईज्ड ऑडिटर कडुन करवून घेऊन विहित नमुन्यांमध्ये मा. संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यापासुन ९० दिवसांचे आत पाठविण्याची तरवीज करणे, पुढील कार्याची रुपरेषा व अंदाजपत्रक तयार करणे व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, संस्थेच्या सभासदत्वाची आलेल्या अर्जाचा विचार करुन त्यावर निर्णय घेणे. तसेच संस्थेच्या हिताविरुध्द अगर ध्येय धोरणांविरुध्द कार्य करणाऱ्या सभासदांविरुध्द योग्यती कार्यवाही करणे व आवश्यक तर त्यांचे सभासदत्व रद्द करणे, वार्षिक सर्वसाधारण सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे, संस्थेने नेमलेल्या व्यक्तिंची संबंधित माहिती वा विवरणे सन १८६० संस्था नोंदणी नियम क्र. ८ अन्वे अनुसूची २ च्या नमुन्यात मा. सहायक संस्था निबंधक, पुणे यांचेकडे वेळोवेळी पाठविणे.

१९. **संस्थेचा निधी, मिळकत व विनियोगः -** संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी सभासद वर्गणी, देणग्या, खाजगी व्यक्तिंकडुन तसेच शासकीय व निमशासकीय अनुदाने या द्वारे मिळणारे उत्पन्न ह्या सर्व रकमा संस्थेच्या निधी समजणेत येईल. तसेच देणगीरुपाने, करार, खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी स्थावर व जंगम मालमत्ता संस्थेची मिळकत समण्यात येईल.

वरील मार्गाने मिळणारी रक्कम संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना पगार व इतर दैनदिन गरजेसाठी वापरली जाईल. परंतू संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व्यावसायिक स्वरुपाची मदत केली तर त्याचा मोबदला दिला जाईल. परंतू संस्थेच्या उत्पन्नतील फायदा सभासदांना मिळणार नाही.

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

BANCHETI HOSPITAL 16 SHIVAJI ... PUNE



Asst. Charity Commissioner

२०. **उद्दीष्ट निहाय खर्चांची तरतूद:** - संस्थेच्या उद्देशपूर्ततेसाठी संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद पुढीलप्रमाणे राहील.

ज्ञापनातील उद्दीष्टांसाठी ८० %

व्यवस्थापकीय उद्दीष्टांसाठी २०%

२१. **बँक खाते:** - संस्थेचा सर्व निधी राष्ट्रीयकृत बँकेत अथवा सहकारी बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून ठेवला जाईल व हे खाते अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार यांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने चालविले जाईल. त्यातील अध्यक्षांची सही आवश्यक राहील.

२२. **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद:** - संस्थेस कायदेशिर मार्गाने कर्ज घेता येईल. त्यापुर्वी मु. सा. वि. व्य. १९५० चे कलम ३५ प्रमाणे मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल. तसेच ठेवी स्विकारता येईल.

२३. **स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणे संबंधीची तरतूद:** - संस्थेस गरज वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच आवश्यक असेल तेंव्हा संस्थेची स्थावर मालमत्ता विकता येईल. त्याबाबत संपुर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतु त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळास मु. सा. वि. व्य. १९५० चे कलम ३६ अन्वये पूर्तता करुन मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

२४. **नियम व नियमावलीमध्ये बदल करण्याची तरतूद:** - कार्यकारी मंडळाने किंवा बहुसंख्या सभासदाने संस्थेच्या चालू नियम व नियमावलीमध्ये बदल किंवा दुरुस्ती सुचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने असा ठराव मांडून मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसीबरोबर पाठविला जाईल. सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला बदल कार्यकारी मंडळाने विहित नमुन्यात बदल अर्ज भरुन मा. सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उपायुक्त यांचेकडे सादर केला पाहीजे.

२५. **नांव आणि उद्देशांत बदल:** - संस्थेचे नांव अथवा उद्देश बदल करावयाचा असेल तर मन १८६० च्या संस्था कायद्यातील कलम १२ व १२अ यातील असणाऱ्या तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात येईल. व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात कार्यकारी मंडळाने विभागिय धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर केला पाहीजे.

अ) आयकर विभागाच्या पुर्वपरवानगीशिवाय संस्थेच्या नांवात व उद्देशांत व तरतुदींमध्ये बदल करता येणार नाही.

ब) संस्थेचे मान्यताप्राप्त चार्टर्ड अकाऊंटंट यांच्या कडुनच हिशेब तपासुन व बनवून घेतले जातील.

क) संस्था विसर्जित करावयाची असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने मंजुरी घेतली जाईल व संस्थेच्या सर्व प्रकरणाचे देवाण-घेवाण संबंधीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. संस्थेची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या संस्थेला जी संस्था आयकर कायद्यांतर्गत तसेच कलम १२ अ प्रमाणे नोंदणीकृत असेल अशा संस्थेस दान म्हणून देता येईल.

ड) संस्थेची मिळकत फंड व गुंतवणूक आयकर कायद्याच्या कलम ११ (५) प्रमाणे करण्यात येईल.

२६. **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत:** - १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एक नमून्यात आपले विभागाचे सहायक संस्था निबंधकाचे कार्यालयातील पाठवावी लागेल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियम १९५० प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीत असलेल्या

| | | |
|---|---|---|
| श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे | श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे | श्री. विश्वनाथ नारायण भंडारे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

व्यक्तीस नोकरी संबधी अटीबाबतचे विवरण अनुसूची दोनच्या नमुन्यात आपले विभागाचे सहायक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

२७. **विसर्जन: -**

संस्थेचे विसर्जन करावयाचे झाल्यास ३/५ बहूमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी १८६० चे अधिनियमातील कलम नं. १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल.

(दाखला)

असे प्रमाणित करण्यात येते की, साईराज शिक्षण प्रतिष्ठान या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी व सत्य प्रत आहे.

Verification

M. V. Bhandare
S. S. Kuthalkar

Sk. Muzammil Haider
Notary
GOVT.OF INDIA
23 OCT 2018

श्री. मिलिंद विश्वनाथ भंडारे
अध्यक्ष

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे
सचिव

श्री. विश्वनाथ नारायण भंडारे
खजिनदार

मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, पुणे विभाग, पुणे यांचे समोर.

न्यासाचे नाव - साईराज शिक्षण प्रतिष्ठान, सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळे नगर, वारजे जकातनाका, पुणे - ५२.

नोंदणी क्र. :- एफ - २६६६४/पुणे.

बदल अर्ज क्र. :- ३४२८/२०१८.

(किरकोळ अर्ज क्र. ०३/२०१९)

कलम :- २२

## निशाणी क्र.१ वरील आदेश

(दि. ०३/०१/२०१९)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मु.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये नियम नियमावलीतील बदलाची नोंद परी-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज विहित नमुन्यात दाखल केलेला असुन मु.सा.वि.व्य.नियम १९५१ चे नियम ६ (४) प्रमाणे सक्षम अधिका-यासमोर पडताळलेला आहे.

३. अर्ज दाखल करणेस झालेला विलंब न्यासाच्या हिताच्या व सुरळीत कारभाराच्या दृष्टीने माफ करणेत आलेला आहे.

४. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, दि. १५.०४.२०१८ रोजीच्या कार्यकारी मंडळाची सभा होऊन जुन्या नियम-नियमावलीत बदल करण्याचे ठरले. त्यानुसार दि. ३०.०६.२०१८ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जुन्या नियम-नियमावलीत बदल करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला असुन सदर बदलाची नोंद परी-१ वर घेणे करीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. अर्जदाराने अर्जासोबत कार्यकारी मंडळाच्या सभेची, वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीसा, नोटीसांच्या पोहोच, सभांच्या उपस्थितीची प्रत, सभांच्या कारणापुरता ठरावांच्या प्रती, न्यासाचे जुने ज्ञापन-नियम नियमावली, न्यासाचे सुधारीत नियम-नियमावली तुलनात्मक तक्ता, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

Post Date ... ५) ... 12.75 % p.a.

६. अर्जदार यांचा अर्ज वाचला, युक्तीवाद ऐकला, त्यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे व वर विवेचन केलेल्या कागदपत्रांप्रमाणे युक्तीवाद करुन झालेला बदल योग्य व कायदेशीर असल्याने मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

७. अर्जदाराचां अर्ज, व अभिलेख्यावरील कागदपत्रे विचारात घेता, संस्थेच्या हिताच्या व सुरळीत कारभाराच्या दृष्टीने बदललेल्या नियम-नियमावलीची परी-१ वर नोंद घेणे आवश्यक वाटते तसेच अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

## आदेश

१. बदल अर्ज मंजूर करणेत येतो.
२. सदर आदेशाची परिशिष्ट-१ वर योग्य ती नोंद घेण्यात यावी.
३. खर्चाबाबत आदेश नाहीत.
४. वरीलप्रमाणे आदेश अर्जदारास कळविण्यात यावे.

ठिकाण :- पुणे.
दि :- ०३/०१/२०१९.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१
पुणे विभाग, पुणे

पुणे येथील मे. सहाय्यक सहाय्यक संस्था निबंधक सो यांचे कोर्टात

किरकोळ अर्ज नं क्र. 03 /2019

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे -- अर्जदार

विरुध्द

कोणी नाही. -- सामनेवाला

यात अर्जदार कळवतो ते खालील प्रमाणे

१ अर्जदार यांनी साईराज शिक्षण प्रतिष्ठान रजि. नं. महा 2239/06(पुणे) पत्ता: - सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ या संस्थेच्या नियम व नियमावली / आर्टीकल्स ऑफ असोसिएशन मध्ये बदल करण्यात आलेला आहे. सदरील झालेले बदलास मंजुरी मिळण्याकामी प्रस्तूतचा अर्ज सादर केलेला आहे.

२ अर्जदारांनी सदर बदल अहवालाचे चौकशीकामी दि. ०६/०४/२०१८ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेच्या नोटीसीची तसेच दि. १५/०४/२०१८ रोजीच्या इतिवृत्तांताची प्रत सादर केलेली आहे. सदरील सभे मध्ये संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करण्याचे बहुमताने बिनविरोध ठरवले असुन तसा ठराव कायम करण्यात आला आहे.

३ अर्जदारांनी सदर बदल अहवालाचे चौकशीकामी दि. १४/०६/२०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसीची तसेच दि. ३०/०६/२०१८ रोजीच्या इतिवृत्तांताची प्रत सादर केलेली आहे. सदरील सभेमध्ये संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करण्याचे बहुमताने बिनविरोध ठरवले असुन तसा ठराव कायम करण्यात आला आहे.

४ सबब, वर नमुद केल्याप्रमाणे सदरील संस्थेच्या ज्ञापन तसेच नियम व नियमावलीमध्ये कायद्याच्या तसेच संस्थेच्या जुन्या नियम व नियमावलींचे तरतुदींप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

५ सदरील झालेला बदल कायद्याने मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो यांचे कडुन मंजुर करुन घेणे गरजेचे व आवश्यक असल्यानेसुध्दा प्रस्तूतचा अर्ज सादर केला आहे.

नमुद न्यास हा या मे. कोर्टाचे स्थळसिमेत कामकाज करत असुन प्रस्तूतचा अर्ज चालवणे व न्यायनिवाडा देण्याचा या मे. कोर्टास अधिकार व अधिकारीता आहे.

७ या व युक्तीवादाचेकामी नमुद करण्यात येणाऱ्या मुद्यांचा विचार व्हावा.

८ सबब विनंती की,

अ प्रस्तूतचा अर्ज मान्य करण्यात यावा.

ब संस्थेच्या सुधारीत नियम व नियमावलीस मान्यता देण्यात यावी.

क इतर योग्यते न्यायाचे आदेश व्हावेत.

हा अर्ज दिला ता. २३ / १० / २०१८.

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे

अर्जदार

प्रतिज्ञालेख

यात मी श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे वय :- सज्ञान धंदा :- समाजकार्य रा. सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, इंगळेनगर, वारजे जकातनाका, पुणे ५२ कारणे सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, वर नमुद संपुर्ण मजकुर माझ्या उत्तम माहीतीप्रमाणे व मला मिळालेल्या माहिती व विश्वासाप्रमाणे संपुर्णपणे खरा व बरोबर आहे.

हे प्रतिज्ञापत्र केले असे ता. २३/ १० / २०१८.

श्री. प्रशांत विश्वनाथ भंडारे

प्रतिज्ञक

Solemnly affirmed before me that the facts mentioned in application are true to the best of his information and belief by Sou/Shri Prashant Vishwanath Bhandare who is identified before me by Adv./ID Kumthekar whom I personally Known

Date : 5/12/18

5/12/18

Superintendent

Public Trust Registration Office

Pune

5/12/2018

मा. सहाय्यक संस्था निबंधक – १ पुणे विभाग, पुणे यांचे समोर

| | |
|---|---|
| न्यासाचे नाव – | साईराज शिक्षण प्रतिष्ठान, सोनासाई बंगला, वरदसाई सोसायटी, ढंगळे नगर, वारजे जकातनाका, पुणे – ५२. |
| नोंदणी क्र. :- | एफ – २६६६४/पुणे. |
| किरकोळ अर्ज क्र :- | ०३/२०१९. |
| कलम :- | १२-अ |

## निशाणी क्र.१ वरील आदेश

(दि. ०३/०१/२०१९)

१. प्रस्तुतचा अर्ज, अर्जदारांनी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १२-अ प्रमाणे न्यासाची नियम-नियमावलीतील बदलाची नोंद अभिलेख्यावर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज विहित नमुन्यात दाखल केलेला असुन मु.सा.वि.व्य.नियम १९५१ चे नियम ६ (४) प्रमाणे सक्षम अधिका-यासमोर पडताळलेला आहे. संस्था नोंदणी अधिनियम १८६० कलम १२अ अन्वये पुर्तता केली आहे.

३. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, दि. १५.०४.२०१८ रोजीच्या कार्यकारी मंडळाची सभा होऊन जुन्या नियम-नियमावलीत बदल करण्याचे ठरले. त्यानुसार दि. ३०.०६.२०१८ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जुन्या नियम-नियमावलीत बदल करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला असुन सदर बदलाची नोंद अभिलेख्यावर घेणे करीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत कार्यकारी मंडळाच्या सभेची, वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीसा, नोटीसांच्या पोहोच, सभांच्या उपस्थितीची प्रत, सभांच्या कारणापुरता ठरावांच्या प्रती, न्यासाचे जुने ज्ञापन-नियम नियमावली, न्यासाचे सुधारीत नियम-नियमावली तुलनात्मक तक्ता, अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

CHARITY ORGANISATION

५. अर्जदार यांचा अर्ज वाचला, युक्तीवाद ऐकला, त्यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे व वर विवेचन केलेल्या कागदपत्रांप्रमाणे युक्तीवाद करुन झालेला बदल योग्य व कायदेशीर असल्याने मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

६. अर्जदाराचां अर्ज, व अभिलेख्यावरील कागदपत्रे विचारात घेता, संस्थेच्या हिताच्या व सुरळीत कारभाराच्या दृष्टीने बदललेल्या नियम-नियमावलीची अभिलेख्यावर नोंद घेणे आवश्यक वाटते तसेच अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

## आदेश

१. किरकोळ अर्ज मंजूर करणेत येतो.

२. सदर आदेशाची परिशिष्ट-१ वर योग्य ती नोंद घेण्यात यावी.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

४. वरीलप्रमाणे आदेश अर्जदारास कळविण्यात यावे.

ठिकाण :- पुणे.
दि :- ०३/०१/२०१९.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१
पुणे विभाग, पुणे

सही शिक्क्याची खरी नक्कल

7/1/19

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे